कामगार कल्याण जनसंपर्क विभाग

# ई - न्युजलेटर



## सोलापूर महानगरपालिका

Volume : Issue : Date : **24-09-2018**

**महानगरपालिकांच्या मालमत्तेवरील , रस्त्यावरील बेकायदेशिरपणे सोडून दिलेली वाहने / बेवारस वाहनांबाबत तक्रार नोंदविण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत**

सोलापूर दि.24/09/2018 :- शहरामध्ये अनधिकृतपणे सोडून दिलेली वाहने तथा बेवारस वाहनामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो.तसेच स्वच्छता व सुरक्षिततेसंदर्भात प्रश्न निर्माण होण्याची शक्यता राहते.याबाबी विचारात घेता सर्व महानगरपालिकांना मार्गदर्शक सूचना निर्गमित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर बाब विचारात घेता मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्र. न्यायप्र-2018 /प्र.क्र.679 /नवि-20 ने दि.24 सप्टेंबर 2018 च्या आदेशानुसार सोलापूर शहरातील रस्त्यावरील बेकायदेशिरपणे सोडून दिलेली वाहने /बेवारस वाहनाबाबत तक्रार नोंदविण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या तक्रार निवारण कक्षामध्ये टोल फ्री दूरध्वनी क्र. 18002331914 व 18002331916 असे दोन नंबर उपलब्ध केले असून शहरातील नागरिकांनी या टोल फ्री नंबरवर तक्राराची नोंद करावी असे आवाहन मा. आयुक्त यांनी केले आहेत.



संपर्क – @ -0217-2735280